# शेतात हृदयविकाराच्या धक्क्याने शेतकऱ्याचा मृत्यू

■ म्हसवड

**म्हसवडच्या** पानमळा येथील शेतात मक्याच्या पिकाला पाणी घालत असताना हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने ३२ वर्षीय तरुण शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना काल रात्रीच्या दहा वाजता घडली. महेश गुलाब नामदे, असे शेतकऱ्याचे नाव असून महेश हा आपल्या आईवडीलाचा एकुलता एक मुलगा होता. या घटनेमुळे पानमळामध्ये एकच हळहळ उडाली आहे.

पानमळा येथील अर्धांगवायूमुळे दोन वर्षांपासून अंथरुणावर खिळून असलेल्या गुलाब नामदे यांना एकुलता एक महेश हा शिक्षित मुलगा होता. मात्र कुटुंब शेतकरी असल्याने आपल्या मुलानेही शेती करत घराकडे लक्ष द्यावे, या उद्देशाने महेश यांच्याकडे शेतीशिवाय पर्याय नव्हता. रात्री आपल्या शेतात मक्याच्या शेतात पाणी घालताना त्याला अचानक हृदयविकाराच्या झटका आला. त्यात त्याचा मृत्यू झाला.

# सोनप्रयानमध्ये यात्रेदरम्यान मुंबईची महिला गंभीर जखमी

■ केदारनाथ

केदारनाथ धामच्या दर्शनासाठी सोमवारी निघालेल्या मुंबईतील रहिवासी मानसी (३२) यांच्या डोक्यावर सोनप्रयाग पुलाजवळील टेकडीवरून दगड पडला. या दुर्घटनेत त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना एअरलिफ्ट करुन सोनप्रयाग रुग्णालयात आणण्यात आले. येथे प्रथमोपचार केल्यानंतर महिलेला रुग्णवाहिकेद्वारे उच्च केंद्रात हलवले.



आतापर्यंत २१ यात्रेकरू जखमी आणि आजारी असताना त्यांना एअरलिफ्ट करण्यात आले आहे. सोनप्रयाग ते गौरीकुंड या ५ किमी अंतरावर अपघातानंतर कोणतेही उपचार करण्यात आलेले नाहीत. येथील अरुंद रस्त्यामुळे यात्रेकरूंना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. केदारनाथ यात्रेला येणाऱ्या भाविकांना दररोज त्रास सहन करावा लागत आहे. अशा परिस्थितीत जिल्हा प्रशासनही तत्परतेने यात्रेकरूंना सर्वतोपरी मदत करत आहे.

# गगन नारंग

## प्रख्यात नेमबाज आणि लंडन ऑलिम्पिकमधील कांस्यपदक विजेता

**मित्रांत गोल्ड फिंगर नावाने प्रसिद्ध असलेल्या गगन नारंग हा शूटर आहे, एअर रायफल शूटिंग हे त्याचे खास क्षेत्र. गगनचे बालपण हरियाणा, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशात गेले. सध्या तो पुण्यात राहून नोकरी करताना नेमबाजी अकादमी चालवतो. वडील हैदराबादेत राहतात. नारंग चार वर्षांचा होता त्यावेळी चेन्नईच्या समुद्रकिना-यावर फुग्यांवर नेम साधायचा.**





**गगनची** आवड बघून वडिलांनी आपली जमीन विकून त्याच्यासाठी रायफल खरेदी केली. लंडन ऑलिंपिकमध्ये पहिल्यांदा क्वालिफाय झालेला पहिला भारतीय खेळाडू. २०१० मध्ये दिल्लीत झालेल्या कॉमनवेल्थ स्पर्धेत गगनला चार सुवर्णपदकं मिळाली होती. तर पुरुषांच्या (सिंगल) दहा मीटरच्या एअर रायफलच्या स्पर्धेत त्याने बरोब्बर ६०० शॉट्स केले. तो एक नवा रेकॉर्ड ठरला. तसेच २०१० च्या एशियन गेम्समध्ये त्याला रौप्यपदक मिळालं होतं. तेव्हा गगन ख-या अर्थाने प्रकाशझोतात आला.

अफाट एकाग्रता आणि जिद्द असलेल्या गगनची याआधीची कामगिरीही उल्लेखनीय आहे. २००३ मध्ये हैदराबाद येथे झालेल्या 'आफ्रो एशियन गेम्स'मध्ये पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल स्पर्धेत गगनला सुवर्णपदक मिळालं आहे. तसेच वर्ल्ड कप २०१० आणि २००८ मध्येही त्याने सुवर्णपदक पटकावलं. हॅनोव्हर येथे झालेल्या प्री-ऑलिम्पिक इव्हेंटमध्ये एअर रायफलमध्ये गगनने ७०४.३ असा स्कोअर केला होता. तो वर्ल्ड रेकॉर्ड होता. याआधी ऑस्ट्रेलियात झालेल्या वर्ल्ड कप २००६ मध्ये थॉमस फार्निक याने ७०३.१ स्कोअर करून रेकॉर्ड प्रस्थापित केला होता. प्रचंड मेहनत, कष्ट करण्याची तयारी या गोष्टींमुळे गगनने आज यशाची नवी नवी क्षितिजं पादाक्रांत केली आहेत. गगन नारंगने २०१२ च्या लंडन उन्हाळी ऑलिंपिक क्रीडास्पर्धांमध्ये नेमबाजी खेळात १० मी. हवाई रायफल नेमबाजीच्या पुरुष गटांत कांस्यपदक जिंकले होते.

लिंपिक स्पर्धांमध्ये वैयक्तीत पदक मिळविणारा गगन नारंग हा भारताचा आठवा खेळाडू आहे. नेमबाजी या खेळाला अधिक प्रोत्साहन मिळावे आणि उत्तम नेमबाज खेळाडू व प्रशिक्षकांबरोबर नेमबाजी पंचांचीही फळी भारतात तयार व्हावी या उद्देशाने गगन नारंगने गगन नारंग फाऊंडेशनची सुरुवात केली आहे. गगन नारंगला 'राजीव गांधी खेल रत्न पुरस्कार हा सर्वोच्च क्रीडा क्षेत्रातला पुरस्कार मिळाला आहे. तसेच भारत सरकारने पद्मश्री पुरस्कार देऊन त्याचा गौरव केला आहे. मी नेमबाज बनलो नसतो तर पायलट बनलो असतो, असे गगनने नंतर म्हटले होते. सुखोई विमान उडवण्याची त्याची इच्छा कायम आहे.

संजीव वेलणकर
पुणे

# कर्नाळ्याचा ऐतिहासिक बुरुज ढासळतोय देखभालीपासून वंचित! पायऱ्या झिजल्या

■ पनवेल

**इतिहासाचा** साक्षीदार, त्याचप्रमाणे पनवेलची ओळख असलेला कर्नाळा किल्ला देखभाल दुरुस्तीपासून गेल्या अनेक वर्षांपासून वंचित आहे. किल्ल्याचा बुरूज आणि तटबंदी ढासळत आहे. पायऱ्यादेखील झिजल्या आहेत. याशिवाय किल्ल्यावर जाण्यासाठी असलेली पायवाटही हरवत चालल्याचे समोर आले आहे.

पनवेलपासून १२ कि.मी अंतरावर कर्नाळा अभयारण्य परिसरात १२४८ मध्ये कर्नाळा किल्ला बांधण्यात आला. देवगिरीच्या यादवाचा सुरुवातीला त्याच्यावर अंमल होता. १५८२ दरम्यान या ठिकाणी निजामशाही होती. मात्र वसईच्या कॅप्टनने ३०० युरोपियन सैन्याचा वेढा टाकून ही प्राचीन वास्तू काबीज केली. पोर्तुगिजांनी १७५० पौंडाच्या बदल्यात तो पुन्हा निजामाला बहाल केला. किल्ल्यांचे अनन्य साधारण महत्त्व लक्षात घेता मुघलांनी काही काळ राज्य केले. १६७० मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी कर्नाळा किल्ला जिंकून त्याचा स्वराज्यात समावेश करून घेतला. पुरंदरच्या तहात मिर्झा राजे जयसिंगाने इतर गडांबरोबर कर्नाळ्याचाही बळी घेतला. मात्र नंतर पुन्हा हा ऐतिहासिक ठेवा हिंदवी स्वराज्यात सामील झाला. पुढे औरंगजेबाने किल्ल्याला पुन्हा पारतंत्र्यात जेरबंद केले. १७४० साली पेशव्यांनी कर्नाळा सर केला. १८०३ मध्ये दुसऱ्या बाजीराव पेशव्यांनी राज्याबरोबर हा किल्लाही गमवला. इंग्रजांनी कर्नाळ्यावर स्वतःचा अंमल केला. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचे आजोबा या किल्ल्याचे किल्लेदार होते.

एकंदरीत ऐतिहासिकदृष्ट्या अतिशय जुना आणि महत्त्वाचा असलेला हा अनमोल ठेवा भौगोलिकदृष्ट्या त्या काळात उपायुक्त होता. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे कर्नाळ्यावरून मुरूड-जंजिरा, अलिबाग, रायगड, घाटमाथा, मुंबई या सर्व गोष्टी पाहता येत होत्या आणि आजही किल्ल्यावर गेल्यावर त्या दिसतात.

# राज ठाकरेंच्या अयोध्या दौऱ्याला जेडियुचाही विरोध

■ मुंबई

**राज** ठाकरे यांच्या अयोध्या दौऱ्याला आता विरोध वाढू लागला आहे. भाजपा खासदार बृजभूषण सिंग यांच्या पाठोपाठ आता भाजपचा मित्र पक्ष असलेल्या जेडीयुने सुद्धा विरोध केला आहे. माफी मागितल्याशिवाय राज ठाकरेंना अयोध्येत पाय ठेऊ देणार नाही. असा इशारा जेडीयूने दिला आहे.

राज ठाकरे यांनी गुढीपाडव्याच्या मुंबईतील सभेत, मशिदीवरील भोंग्याना विरोध करून जर भोंगे लागले तर तुम्हीही भोंगे लाऊन त्यावर दुप्पट आवाजात हनुमान चालीसा पठण करा असा कार्यकर्त्यांना आदेश दिला होता. तेंव्हापासून संपूर्ण महाराष्ट्रातले राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. राज ठाकरे यांनी मशिदीवरील भोंग्याना विरोध करून हिंदुत्वाच्या मुद्द्याला हात घातला. आणि अयोध्येला जाण्याची घोषणा केली. पण त्यांच्या या घोषणेला भाजपचे उत्तर प्रदेशातील खासदार बृजभूषण यांनी कडाडून विरोध केला होता. राज ठाकरे आणि त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी परप्रांतीयांच्या मुद्द्यावरून उत्तर भारतीयांना मारहाण केली होती. त्यातील काहीना महाराष्ट्रातून पिटाळून लावले होते. त्यामुळे जोवर राज ठाकरे उत्तर भारतीयांची माफी मागत नाहीत तोवर त्यांना अयोध्येत पाय ठेवायला देणार नाही अशी भूमिका घेतली आहे. त्यांच्या या भूमिकेला महाराष्ट्रातील भाजपच्या काही उत्तर भारतीय नेत्यांनीही विरोध केला आहे. हा विरोध सुरु असताना आता भाजपचा मित्र पक्ष असलेल्या जेडीयुनेही विरोध केला आहे. जेडीयू पक्षाचे नेते के सी त्यागी यांनी सांगितले आहे की राज ठाकरे जोवर उत्तर भारतीयांची माफी मागत नाही तोवर त्यांना उत्तर प्रदेशात पाय ठेऊ देणार नाही. त्याच्या पक्षाने मुंबईत राहणाऱ्या युपी बिहारच्या लोकांना खूप त्रास दिलेला आहे. त्यामुळे त्यांनी माफी मागायलाच हवी असे त्यागी यांनी सांगितले.

# गडचिरोलीत माओवाद्यांचा धुमाकुळ पोकलेनसह ट्रक-टॅक्टरची जाळपोळ

■ गडचिरोली

**दोन** दिवसांपूर्वी एका पोलीस खबऱ्याची क्रूर पध्दतीने माओवाद्यांनी हत्या केल्याची घटना ताजी असताना पुन्हा एकदा जिल्ह्यात माओवाद्यांकडून धुमाकुळ घातल्याचे समोर आले आहे. काल मध्यरात्री माओवाद्यांनी हालेवारा परिसरात दोन पोकलेन, एक ट्रक आणि एका ट्रॅक्टरची जाळपोळ केली. तसेच रस्त्याच्या कामावर असलेल्या कर्मचार्यांनाही मारहाण केली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

एटापल्ली भागात सुरजागड लोह खनिज प्रकल्प सुरु आहे. याविरोधात माओवादी नेहमीच कारवाया करताना अनेक वेळा जाळपोळ सारख्या घटना घडवून आणतात. आज पुन्हा दोन वर्षानंतर जाळपोळीची घटना समोर आली. मवेली ते पिपलीबुर्गा या २० किमी अंतराचे रस्ता बांधकाम गेल्या एक महिन्यापासून सुरु आहे. दिवसभरातील काम आटोपल्यानंतर ही वाहने एटापल्ली-कसनसूर मार्गावर असलेल्या मवेली गावात उभी केली जातात. काल रात्री दीडच्या सुमारास माओवादी बांधकामस्थळी दाखल झाले.

# मुख्यमंत्री माझ्या कामांची बरोबरी करु शकत नाही! राणेंची टीका

■ मुंबई

**केंद्रीय** मंत्री नारायण राणेंनी आज पत्रकार परिषद घेऊन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंवर जोरदार टीका केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने ५० वर्षे शिवसेनेने दुकान चालवले. आम्ही विरोधकांच्या अंगावर गेलो म्हणून शिवसेना राहिली तुम्ही कधी अंगावर गेलाच नाहीत, बाळासाहेब ठाकरे यांनी उद्धव ठाकरे असूनही मला मुख्यमंत्री केले. तुम्ही १० वर्ष मुख्यमंत्री राहिलात तरी माझ्या ८ महिन्यांच्या कामाची बरोबरी करु शकणार नाही, मुख्यमंत्र्यांनी किती लोकांना रोजगार दिले हे सांगावे, अशा शब्दांत राणेंनी मुख्यमंत्र्यांवर जोरदार टीका केली.

पुढे नारायण राणे म्हणाले की, १४ तारखेला उद्धव ठाकरे यांनी फार मोठा गवगवा करून बीकेसीमध्ये जाहीर सभा घेतली. कुठलीही निवडणूक नसताना मुख्यमंत्र्यांना एवढ्या जाहीरात बाजी करून सभा घ्यावी लागली. शक्तीप्रदर्शन करण्यासाठी सभा घेतली. जनतेने सभा किती भरली होती आणि खर्च किती केला. मुख्यमंत्री म्हणायला मला लाज वाटते. महाराष्ट्राचा इतिहास माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांपासून ते काल परवा देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत असंख्य मुख्यमंत्री झाले. त्यांनी आपली प्रतिमा आणि राज्याची प्रतिमा वाढवण्याचे काम केले. सर्व दिग्गज होते. राज्यातून दिल्लीला अनेकजण गेले. देशातही आपली कारकिर्द आपल्या कर्तृत्वाने गाजवली. हा इतिहास महाराष्ट्राचा आणि मुख्यमंत्र्यांचा असताना पर्वाचा भाषण ऐकल्यानंतर वाईट वाटले.

# सिंहगडावरील ई-बस सेवेला तात्पुरती स्थगिती

■ पुणे

**सिंहगडावरील** अरुंद रस्ता, त्यामुळे बसच्या अपघातांचा होणारा संभाव्य धोका लक्षात घेत पीएमपी प्रशासनाने सिंहगडावरील ई-बससेवा तात्पुरती स्थगित केली आहे. सिंहगडावरील पर्यावरण संवर्धन आणि वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी वनविभाग आणि पीएमपी प्रशासनाकडून सिंहगडावर ई-बस सेवा सुरु करण्यात आली होती. मात्र या सेवेला नागरिकांनी प्रचंड विरोध केला होता. तसेच दोन दिवसांपूर्वीच सिंहगडाच्या तीव्र उतारावरुन वळण घेताना एक मोठा अपघात होता होता वाचला. त्यामुळे पीएमपी प्रशासनाने येथील ई बस सेवा काही कालावधीसाठी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

# नेपाळ संस्कृती जपणारा देश पंतप्रधान नरेंद्र मोदींचे वक्तव्य

■ लुंबिनी

**बुद्ध** पौर्णिमानिमित्त सोमवारी गौतम बुद्धांचे जन्मगाव असलेल्या (नेपाळ)लुंबिनीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हजेरी लावली होती. त्यावेळी मोदी म्हणाले की, नेपाळ आपली संस्कृती जपणारा देश आहे. आमचा सामायिक वारसा, संस्कृती आणि प्रेम आहे. हे आमचे भांडवल आहे. ते जितके मजबूत असेल तितकेच आपण बुद्धाचा संदेश जगापर्यंत पोहोचवू शकतो. मोदी म्हणाले की, बुद्ध हे देखील विशेष आहेत कारण त्यांनी केवळ उपदेशच केला नाही तर मानवतेला प्रबोधनही केले. ते नक्कीच सामान्य मूल म्हणून जन्माला आले नव्हते. प्राप्तीपेक्षा त्याग महत्त्वाचा आहे याची जाणीव त्यांनी करून दिली. म्हणून त्यांनी जंगलात भटकंती केली, तपश्चर्या केली आणि संशोधन केले. गौतम बुद्धांनी सांगितले होते की, स्वतःचा दिवा बना. माझे विचारही विचारपूर्वक आत्मसात करा, बुद्धांचा जन्म पौर्णिमेच्या दिवशी झाला आणि या दिवशी त्यांना बोधगया येथे ज्ञानप्राप्ती झाली आणि त्यानंतर या तारखेला त्यांना निर्वाण मिळाले. तो निव्वळ योगायोग नव्हता.


**जाहीर सुचना**

तमाम जनतेला याद्वारे सुचित करण्यात येते की, दुकान क्र. ४, तळ मजला, भूषण अपार्टमेंट को. ऑप. हौ. सो. लि., ओम नगर, वसई रोड पश्चिम, ता. वसई, जि पालघर, ४०१२०२, या मिळकतीशी संबंधीत पुढील नमूद मुळ दस्तऐवज हरवले आहेत १. मे. रेणुका बिल्डर्स प्रा. लि. व श्री. मनोज एन लाखानी यांच्यातील दिनांक १० ऑक्टोबर १९९१ रोजीचा नोंदणी क्र. ५१२०/१९९१ दिनांक १९ नोव्हेंबर १९९१ असा असलेला मुळ करारनामा व त्याची मुळ नोंदणी पावती २. श्री. मनोज एन. लाखानी व श्री. रवी शंकरलाल जैन यांच्यातील मुळ करारनामा. सदर दस्तऐवजांची मूळ प्रत कोणासही सापडल्यास आमच्या खालील पत्त्यावर ताबडतोब सुपूर्द करावे. जर कोणत्याही व्यक्तिला वा संस्थेला वर उल्लेखिलेल्या मालमत्तेसंबंधी वा त्याच्या हस्तांतराबाबत कोणताही हक्क, दावा आणि हितसंबंध असल्यास ते सुचना प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत पुष्टयर्थ कागदपत्रांसोबत आमच्या खाली उल्लेखिलेल्या पत्त्यावर लेखी स्वरुपात पाठवावे अन्यथा असे दावे त्यागित, अधित्यागित समजण्यात येईल

**पत्ता – श्री. पराग ज. पिंपळे,**
**वकील, मुंबई उच्च न्यायालय,**
एस/४, प्रविण पॅलेस, पंडित दिनदयाळ नगर, वसई रोड पश्चिम, ता. वसई, जि. पालघर
मो. ९८९००७९३५२ दिनांक: १७.०५.२०२२

**जाहीर सूचना**

सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की, बँक ऑफ बडोदा, एसएमई जोगेश्वरी शाखा विनंती केलेल्या कर्ज/ऋण सुविधेकरिता तारण म्हणून श्री. संदीप मातादीन जांगिड आणि श्रीमती सुशीला मातादीन जांगिड यांच्या नावे असलेली निम्नउल्लेखित मालमत्ता स्वीकारण्यास इच्छुक आहे. जर कोणाचे निम्नउल्लेखित मालमत्तेवर कोणताही हक्क/शीर्षक/हितसंबंध/दावे असल्यास, त्यांनी त्यांचा दावा सिद्ध करणाऱ्या आवश्यक पुराव्यासह १० दिवसांच्या आत बँकेस संपर्क साधावा असा सल्ला त्यांना देण्यात येतो.

जर १० दिवसांमध्ये कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्यास, असे मानले जाईल की, मालमत्ता कोणत्याही प्रभार/दावा/बोज्यापासून मुक्त आहे आणि बँक गहाणवट पूर्ण करेल.

**अनुसूची**

ठाणेच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप जिल्ह्यामधील महसूल गाव: खारी, तालुका आणि जिल्हा: ठाणे येथील जुना सर्व्हे क्र. १५४, नवीन सर्व्हे क्र. २६, हिस्सा क्र. १५ धारण केलेली जमीन, राहुल पार्क, भाईंदर (पूर्व), जि. ठाणे-४०११०५ येथे स्थित "राहुल ड्रीम" "ए" को-ऑप. हौसिंग सोसा. लि." या इमारतीमधील ७ व्या मजल्यावरील सदनिका क्र. ७०२, मोजमाप ८०० चौ.फू. (बिल्ट अप क्षेत्रफळ)

मनिष डी. तिवारी अँण्ड असोसिएट्स
वकील उच्च न्यायालय
ऑफीस क्र. १०१-१०२, श्री कृष्णा पार्क, सोपारकर हाउस, राजोबा शंकर रोड, चेंदणी, ठाणे पश्चिम - ४०० ६०७. मोबा. ९६१९३०२१२८

**फॉर्म जी**
**स्वारस्य अभिव्यक्तीकरिता आमंत्रण**
(नादारी आणि दिवाळखोरीपणा (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए (१) अन्वये)

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | केसर मल्टिमोडल लॉजिस्टिक्स लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक | ३०.०९.२०११ |
| ३. | प्राधिकरण, ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले आहे | आरओसी - मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U74120MH2011PLC222597 |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोचा नोंदणीकृत कार्यालय व मुख्य कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | ओरिएंटल हाऊस, ७, जमशेदजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०. |
| ६. | कॉर्पोरेट ऋणकोची दिवाळखोरी सुरू झाल्याचा दिनांक | दि. १७.०२.२०२२ (दि. १७.०२.२०२२ रोजीची आदेशाची प्रत अंतरिम ठराव व्यावसायिक यांना दि. ०४.०३.२०२२ रोजी प्राप्त झाला.) |
| ७. | स्वारस्य अभिव्यक्तीच्या आमंत्रणाचा दिनांक | १७.०५.२०२२ |
| ८. | कोड च्या कलम २५ (२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराची पात्रता उपलब्धतेचे ठिकाण : | https://www.kesarmultimodal.com/ |
| ९. | कलम २९ ए अन्वये लागू अपात्रता निकष उपलब्धतेचे ठिकाण : | https://www.kesarmultimodal.com/ |
| १०. | स्वारस्य अभिव्यक्ती प्राप्त करण्याचा अंतिम दिनांक | दि. ०१.०६.२०२२ |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक | दि. १०.०६.२०२२ |
| १२. | तात्पुरत्या यादीस आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि. १५.०६.२०२२ |
| १३. | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी पारित करण्याचा दिनांक | दि. २५.०६.२०२२ |
| १४. | संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मुल्यांकन नमुना, ठराव योजनेकरिता विनंती पारित करण्याचा दिनांक | दि. १५.०६.२०२२ |
| १५. | ठराव योजना, मुल्यांकन नमुना, माहिती निवेदनपत्रिका आणि अधिक माहिती मिळविण्याकरिता विनंतीची पद्धत | ठराव व्यावसायिक केवायसी, गुंतवणुकीची क्षमता, व्यवस्थापनेची क्षमता आणि आयबीसी, २०१६च्या कलम २९ए अन्वये पात्रता आणि पूर्व-पात्रता यांची पडताळणी केल्यानंतर ठराव व्यावसायिक ठराव योजना/मुल्यांकन नमुना/माहिती निवेदनपत्रिका इलेक्ट्रॉनिक स्वरुपात सामायिक करतील. |
| १६. | ठराव योजना सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि. २६.०७.२०२२ |
| १७. | ठराव व्यावसायिकाकडे ठराव योजना सादर करण्याची पद्धत | अनुक्रमांक २१ मध्ये नमुद केलेल्या ईमेल आयडीवर ईलेक्ट्रॉनिक स्वरुपात |
| १८. | निवाडा प्राधिकरणाकडे मंजुरीकरिता ठराव योजना सादर करण्याचा अंदाजित दिनांक | धनको समिती (सीओसी) द्वारे मंजूर केल्यावर लगेचच. |
| १९. | ठराव व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | श्री. प्रशांत जैन (IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131) |
| २०. | ठराव अधिकाऱ्याचे नाव, पत्ता आणि ईमेल, मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार | श्री. प्रशांत जैन पत्ता: ए५०१, शांती हाईट्स, प्लॉट क्र. २, ३, ९, बी/१०, सेक्टर ११, कोपरखैराणे ठाणे, नवी मुंबई महाराष्ट्र - ४००७०९. ईमेल आयडी: ipprashantjain@gmail.com |
| २१. | ठराव व्यावसायिकासोबत पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | बी/६१०, बीएसईएल टेकपार्क, वाशी रेल्वे स्थानकासमोर, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३. ईमेल: kmll.cirp@gmail.com |
| २२. | अधिक तपशील मिळण्याचे ठिकाण | https://www.kesarmultimodal.com/ |
| २३. | फॉर्म जी प्रसिद्धीचा दिनांक | दि. १७.०५.२०२२ |

सीए प्रशांत जैन
ठराव व्यावसायिक
नोंदणीकरण क्र.: IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131
दिनांक: १७.०५.२०२२
ठिकाण: मुंबई

**THE MUNICIPAL CO-OPERATIVE BANK LTD., MUMBAI**
MUNICIPAL BANK BHAVAN, 245, P. D' MELLO ROAD, FORT, MUMBAI –400 001
TEL: +91-22-2261 3814 / +91-22-2271 7800
EMAIL:mcbank@mcbmumbai.com

**TENDER NOTICE**

The Municipal Co-Op. Bank Ltd., Mumbai invites sealed quotations of the Electrical Auditors for conducting **Electrical Audit (Electrical Safety & Energy)** of its Head Office Building, (Municipal Bank Bhavan, 245, P.D'mello Road, Fort, MUMBAI 400001) from the Energy Auditors/Firms/Electrical Consultants etc. Tender documents shall be downloaded from the bank's website: **www.municipalbankmumbai.com** from 17/05/2022 to 31/05/2022. Last date and time for submission of Tender : On or Before 31/05/2022 upto 3.00 PM

PLACE: MUMBAI Sd/-
DATE: 17/05/2022 GENERAL MANAGER

**जाहीर सुचना**

तमाम जनतेला याद्वारे सुचित करण्यात येते की, सदनिका क्र. सी–०१, तळ मजला, श्री लक्ष्मण को. ऑप. हौ. सो. लि., १०० फुट रोड, सेंट फ्रान्सिस स्कुल जवळ, दिवाणमान, वसई रोड पश्चिम, ता. वसई, जि. पालघर, या मिळकतीशी संबंधीत दिनांक १० ऑक्टोबर १९९६ रोजीच्या नोंदणीकृत करारनामा क्र. वसई–१/२७६६/१९९६ याबाबतची दिनांक १७ ऑक्टोबर १९९६ रोजीची मुळ नोंदणी पावती हरवली आहे. सदर दस्तऐवजांची मूळ प्रत कोणासही सापडल्यास आमच्या खालील पत्त्यावर ताबडतोब सुपूर्द करावे

सदर श्री लक्ष्मण को. ऑप. हौ. सो. लि. या इमारतीतील तळमजल्यावरील सदनिका क्र सी/१ या सदनिकेचे मालक व दुस–या मजल्यावरील सदनिका क्र. डी/२०४ या सदनिकेच्या सहमालक श्रीमती दौलत मुरादअली पडानीया या दिनांक ०९/०५/२०२१ रोजी मयत झाले असून त्यांच्या मृत्यूपश्चात सदर सदनिका ही त्यांचे वारस पती श्री. मुरादअली सावजी पडानीया यांच्या नावे सदर सोसायटीने हस्तांतरीत करावयाचे ठरविले आहे जर कोणत्याही व्यक्तिला वा संस्थेला वर उल्लेखिलेल्या मालमत्तेसंबंधी वा त्याच्या हस्तांतराबाबत कोणताही हक्क, दावा आणि हितसंबंध असल्यास ते सुचना प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत पुष्टयर्थ कागदपत्रांसोबत आमच्या खाली उल्लेखिलेल्या पत्त्यावर लेखी स्वरुपात पाठवावे अन्यथा असे दावे त्यागित, अधित्यागित समजण्यात येतील व सदर सदनिका श्री. मुरादअली सावजी पडानीया यांच्या नावे हस्तांतरीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी

**पत्ता – श्री. पराग ज. पिंपळे,**
**वकील, मुंबई उच्च न्यायालय,**
एस/४, प्रविण पॅलेस, पंडित दिनदयाळ नगर, वसई रोड पश्चिम, ता. वसई, जि. पालघर
मो. ९८९००७९३५२ दिनांक: १७.०५.२०२२

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**
**बांधकाम विभाग**
**निविदा सूचना क्र. ११ (२०२२-२३)**

प्रशासक, कल्याण डोंबिवली महानगरपालिका हे कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील १७ कामांकरीता B-1 नमुन्यात योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवित आहेत.

कोरे निविदा फॉर्म व निविदेबाबतच्या सर्व अटी व शर्तीची संपूर्ण माहिती महाराष्ट्राचे **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर दि. १७/०५/२०२२ ते दि. ३०/०५/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. भरण्यात आलेल्या निविदा ह्या दि. ३१/०५/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत वरील संकेतस्थळावर अपलोड करणेत याव्यात. प्राप्त निविदा दि. १/०६/२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येतील.

कोणत्याही कारणास्तव एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचा अधिकार प्रशासकांनी राखून ठेवला आहे. याबद्दलचा त्यांचा निर्णय अंतिम व सर्व निविदाधारकांना बंधनकारक राहिल.

निविदेबाबतची अधिक माहिती **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
शहर अभियंता
जा. क्र.कडोंमपा/जसंवि/मुका/१०७ कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
दि. १३/०५/२०२२ कल्याण.

**PUBLIC NOTICE**

NOTICE is hereby given that the Original Membership Document i.e.**Share Certificate No. 73 for 5 Shares** bearing Distinctive Nos. **361 to 365 of Byculla Market Co-operative Premises Society Ltd.**, having Reg. No. B.O.M./WE/G.N.L.(O.)/386/88-89, standing in the name of **Lateshri. Yuvraj Sitaram Doke** have reported lost (Missing Complaint Dated 06-04-2022, bearing Lost Property Registration Number – 166 / 2022in Respect of Property lost/missingis Registered at Manchar Police Station) and that an application for issue of Duplicate Share Certificate in lieu thereof has been made to the society by**Shri. Vishal Yuvraj Doke,S/o**Lateshri. **Yuvraj Sitaram Doke**. Any person who has any claim in respect of the said Share Certificate or objection if any against issuance of such duplicate Share Certificate should lodge such claim or objection with the society at its registered office address at**CT Survey No. 674, 674/1, 674/2, Dr. Ambedkar Road, Byculla, Mumbai-400027**within 14 days from the date of publication of this notice. If no claims or objection are received during this said period then society shall be free to issue duplicate share certificate.

Sd/-
Mumbai :- 400027. **Shri. Vishal Yuvraj DokeS/o**
Date :- 15-05-2022 Late **Shri.Yuvraj Sitaram Doke**
**Byculla Market Co-operative Premises Society Ltd.**,
Reg. No. B.O.M./WE/G.N.L.(O.)/386/88-89, **CT Survey No. 674, 674/1, 674/2, Dr. Ambedkar Road, Byculla, Mumbai-400027.**